# महिला व बाल कल्याण विभाग जिल्हा परिषद सांगली

दुरध्वनी क्रमांक 02332325914 E-mail-icdsdyceo@gmail.com

**कोटेशन मागणी नोटीस क्र.3**

**जाक्र.जिपंसा/मबाकयोजना/दायित्व/आस्था/वशि/** 1150 /2024-25 **दिनांक** - 05 / 02 /2025

प्रति,

-----------------------------------------

-----------------------------------------

विषय :- सन 2023-24 या आर्थीक वर्षात जि.प.स्वीय निधीमधून मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रीक प्रशिक्षण- **घनकचरा व्यवस्थापन व बायोगॅस प्रशिक्षण देणेकरिता** दरपत्रक सादर करणेबाबत.

जिल्हा परिषद स्वीय निधी सन 2024-25 या आर्थीक वर्षात (सन 2023-24 चे दायित्व) सांगली जिल्हयातील ग्रामीण भागातील महिला व मुलींना व्यावसायिक व तांत्रीक प्रशिक्षण अंतर्गत **घनकचरा व्यवस्थापन व बायोगॅस** प्रशिक्षण देणेकरिता स्थानिक निविदा धारकांकडून खाली नमूद केलेनुसार तांत्रीक व दराचा सिलबंद लखोटा अशा दोन लखोटे पध्दतीने दरपत्रके मागविणेत येत आहेत.

प्रशिक्षणाचे ठिकाण हे संबंधित बाल विकास अधिकारी यांचेशी चर्चा करुन निश्चित करणे,त्या ठिकाणी भौतिक सुविधा संस्थेने करणे,प्रशिक्षण साहित्य व कच्च्या मालाची व्यवस्था करणे, लेखन सामुग्री, कोर्सबाबत आवश्यक साहित्य इत्यादी बाबी संस्थेने पुरविणे यासह दरपत्रक मागणी करणेत येत आहे.

**कामाचे नांव** - महिला व बाल कल्याण विभाग जिल्हा परिषद,सांगली अंतर्गत जिल्हा परिषद,स्वीय निधी मधून सांगली जिल्हयातील ग्रामीण भागातील महिला व मुलींना व्यावसायिक व तांत्रीक प्रशिक्षण अंतर्गत 90 तासांचे घनकचरा व्यवस्थापन व बायोगॅस उत्पादन प्रशिक्षण देणे.

**प्रशिक्षण घेणेचा प्रकल्प** :- 1) उमदी - 28 लाभार्थी( तासगांव -1 लाभार्थी त्यांचे इच्छेनुसार उमदी येथे प्रशिक्षण घेईल ) असे एकूण 29 लाभार्थी

**प्रशिक्षणाचे स्वरुप :-** (1) मानवी जिवनामध्ये स्वच्छतेचे महत्व (2) घनकचरा व सांडपाणी बाबत ओळख (3) घनकचरा व्यवस्थापनाबाबत चित्रफित (4) घनकचरा व्यवस्थापण करणे (5) सार्वजनिक घनकचरा संकलन करणे (6) घनकचरा व्यवस्थापनेकरिता प्रक्रिया व यंत्रणा (7) घनकचरा व्यवस्थापन उपाययोजना किंवा घेण्यात येणारे घटक उपक्रम (8) घनकचरा कृती आराखडा माहिती व तयार करण्याची पध्दती. (9) सुका कचरा प्रक्रिया करुन पुनर्वापरास विक्री करणेसाठी इत्यादी
बायोगॅस प्रशिक्षण :- 1) कच-यापासून खत निर्मिती 2) गांडूळखत तयार करणे व विक्री करणे 3) कच-याचे विभाजन व व्यवस्थापन इत्यादी.

**सादर करावयाची कागदपत्रे (लखोटा क्रमांक 1)** :- संस्थेचे शासकिय नोंदणी प्रमाणपत्र 2) संस्था कौशल्य विकास विभागाकडे V.T.P. (Vocational Training Provider) /V.T.I./ SMART म्हणून नोंद असलेचे प्रमाणपत्र 3) संस्थेचे पॅनकार्ड 4) संस्थेचे GST प्रमाणपत्र / सूट असलेस सूट प्रमाणपत्र 5) संस्थेचे मागील तीन वर्षाचे आयकर रिटर्न (सन 2021-22 ते 2023-24)/ सूट असलेस सूट प्रमाणपत्र 6) संस्थेचे मागील तीन वर्षाचे ऑडीट रिपोर्ट (सन 2021-22 ते 2023-24) 7) शासकिय कामाचा अनुभव असलेबाबत आदेशाची प्रत 8) संस्था काळया यादीत नसलेबाबत संस्थेचे हमीपत्र.

**टिप** -1) एका लाभार्थीवर जास्तीत जास्त 5000/- खर्च करणेत येईल.
2) प्रशिक्षण किंमतीच्या 10 टक्के होणारी रक्कम लाभार्थीकडून संस्थेने भरुन घेणे आवश्यक आहे.सदरची होणारी रक्कम देयकातून वजा करुन घेणेत येईल व उर्वरीत देयक अदा करणेत येईल.
3) संस्था पात्र / अपात्र ठरविणेबाबतचा अंतिम अधिकार कार्यालयास राहील.

**लखोटा क्र.2-** दराचा लखोटा -

| प्रशिक्षणाचे नाव | एकूण दिवस | प्रशिक्षणाचे एकूण तास | 90 तासांचे प्रशिक्षण देणेसाठी प्रति लाभार्थी एकूण दर नमूद करावेत. |
|---|---|---|---|
| घनकचरा व्यवस्थापन व बायोगॅस प्रशिक्षण | आदेशानुसार | 90 | |

वर नमूद केलेनुसार सदर योजनेचे दरपत्रक दिनांक ६|०२|२०२४ ते १४|०२|२०२४ या कालावधीत महिला व बाल कल्याण विभाग जिल्हा परिषद सांगली येथे सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत सादर करणेत यावेत.तदनंतर प्राप्त होणारी दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.तसेच सदरची दरपत्रके त्याच दिवशी किंवा कार्यालयाच्या सोयीनुसार उघडणेत येतील.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाक)**
**जिल्हा परिषद,सांगली**

**प्रत** :- सदरची कोटेशन मागणी नोटीस कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावणेत यावी.